## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक 19.06.2010 रोजी (का.प.क्रं.03) संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक 19 जुन 2010 रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी 12.15 वाजता **वंदेमातरम्** या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री. सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री. विजय लक्षमणराव वाघचौरे
03. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री. खान आगा मीयॉ
05. स. श्री. विकास रतनलाल जैन
06. स. श्री. रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री. महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ. साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स.श्री. मधुकर दामोधर सांवत
13. स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स.श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**विषय क्र. 08 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, दिनांक 1/7/2010 ते 30/6/2011 या कालावधीसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्यीत आयात होणाऱ्या मालावरील जकात व रहदारी फी वसुलीकरिता खाजगी अभिकर्ता नियुक्तीसाठी दिनांक 24/5/2010 अन्वये वर्तमानपत्रात टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक 14/6/2010 पर्यंत ई-टेंडरींगद्वारे निविदांची विक्री झाली होती. ई-टेंडरींगद्वारे प्राप्त निविदा दिनांक 16/6/2010 रोजी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात आल्या. त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

1. मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर.
2. मे. सहकार ग्लोबल प्रा. लि., मालाड(प), मुंबई.

जकात कर व रहदारी फी संकलनाच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार 1) मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर, 2) मे. सहकार ग्लोबल प्रा. लि., मालाड(प), मुंबई यांनी निविदेतील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने सदरच्या दोन्ही एजन्सींचे ई-टेंडरींगद्वारे प्राप्त झालेले

कमर्शियल-बीड (Commercial bid) उघडण्यात आले. ई-टेंडरींगद्वारे उघडण्यात आलेल्या जकात कर व रहदारी फी संकलनाच्या निविदेतील देकार रक्कमेचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

<u>जकात कर व रहदारी फी संकलन निविदेतील प्राप्त झालेल्या देकार रक्कमेचा</u>

<u>तुलनात्मक तक्ता</u>

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | एकूण देकार रक्कम |
|---|---|---|
| 1. | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर | 136,77,00,000/- |
| 2. | मे.सहकार ग्लोबल प्रा.लि.,मालाड(प), मुंबई | 136,92,60,000/- |

वरील प्राप्त निविदांपैकी मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. मालाड(प), मुंबई यांनी सर्वात जास्त (Highest Bid) म्हणजेच रक्कम रूपये 136,92,60,000/- चा सर्वाधिक देकार दिलेला आहे. तथापि प्राप्त देकार रक्कमेच्या अनुषंगाने संबंधितासोबत वरील दिलेली देकार रक्कम वाढविणे करिता वाटाघाटी (Negotiation) करण्यास मे. सहकार ग्लोबल प्रा. लि., मालाड(प), मुंबई यांना दिनांक 16/6/2010 रोजी सायंकाळी 5.30 वाजता बोलाविण्यात आले.

जकात कर व रहदारी फी संकलनाकरिता सर्वाधिक (Highest Bid) देकार रक्कम देण्यात आलेल्या संबंधित एजन्सी सोबत वाटाघाटीअंती रूपये 136,92,60,000/- ऐवजी सन 2010-11 या वर्षासाठी एकूण देकार रक्कम रूपये 138,00,60,000/- पर्यंत वाढवून देण्याची लेखी संमती दिलेली असल्याने सदरची एकूण देकार रक्कम रूपये 138,00,60,000/- ही रक्कम देण्यास लेखी संमती दिलेली आहे. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनुसूची-'ड' मधील प्रकरण-8 चे नियम-35 मधील तरतुदींच्या अधीन राहून दिनांक 01/07/2010 ते 30/06/2011 या कालावधीसाठी सर्वाधिक (Highest Bid) देकार रक्कम देणारी मे. सहकार ग्लोबल प्रा. लि., मालाड, मुंबई यांना जकात कर व रहदारी फी संकलन करण्यासाठी जकात संकलन अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : विषय क्रमांक 8 खुलासा करण्यात यावा प्रशासनाचा.

जकात अधिक्षक : सन 2010-11या आर्थिक वर्षामध्ये जकात रहदारी फिस संकलन करण्यासाठी प्रशासनाकडुन दिनांक 24.05.2010 ला 136.72 कोटीची निवीदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निवीदा उघडण्याची अंतिम दिनांक 16.06.2010 रोजी उघडण्यात आल्या त्याच्यामध्ये मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि.,उल्हासनगर यांची 136 कोटी 77 लक्ष रूपयांची निवीदा प्राप्त झाली आणि दुसरी मे.सहकार ग्लोबर प्रा.लि.मालाड(प)मुंबई यांची 136 कोटी 92 लक्ष 60 हजार रूपयांची निवीदा प्राप्त झाली. सदर निवीदेमध्ये हायस्ट बिडर जो होता तो सहकार ग्लोबल प्रा.लि.मालाड यांना पत्र देवुन वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले आणि वाटाघाटी अंती त्यांच्याकडुन म्हणजे एकुण देकार रक्कम 138 कोटी 60 हजार मंजूर करून घेण्यात आली आणि तसा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949च्या अनुसूची-ड प्रकरण-8 मधील नियम-35 नुसार मान्यतेसाठी मा.स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : आता जो प्रस्ताव आलेला आहे तो 138 कोटी 60 लाख रूपयाचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आलेला आहे. ते 138 कोटी 60 हजार रूपयांचा प्रस्ताव आहे खुलासा करण्यात यावा 60 हजार कि 60 लक्ष.

जकात अधिक्षक : 138 कोटी 60 हजार चा प्रस्ताव आहे.

श्री.विकास जैन : मा.सभापती खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : 138 कोटी 60 हजार हे आपल्या Negotiation करून

जकात अधिक्षक : Negotiation करून केलेले आहे त्यांनी देकार रक्कम 136 कोटी 92 लक्ष 60 हजारची निवीदा भरली होती. वाटाघाटीअंती प्रशासनातर्फे ते 138 कोटी 60 हजार केलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : माझा असा प्रश्न आहे आपल्याला 138 कोटी 60 लाखाची निवीदा प्रशासनाने स्थायी समितीपुढे सादर केलेली आहे टार्गेट कस कस प्रशासनाने ठेवलेले त्याचा सविस्तर खुलासा करावा.

जकात अधिक्षक : मा.सभापती मागच्या वर्षीची जे टार्गेट होते 124 कोटी 29 लक्ष त्याच्यावरती शासन निर्णय 1994 नुसार 10 टक्के नैसर्गिक वाढ करून 136 कोटी 72 लक्ष हे टार्गेट निश्चित करण्यात आल होत त्यानुसार जाहिर निवीदा प्रसिध्द करण्यात आली.

श्री.विकास जैन : सर्व प्रथम जे टार्गेट प्रशासनातर्फे ठरविण्यात आले होते

श्री.अमित भुईगळ : जो ठराव केला आहे तो मान्य व्हावा.

श्री.विकास जैन : मा.सभापती महोदय

श्री.अमित भुईगळ : हा ठराव मंजूर करण्यात यावा.

श्री.जगदीश सिध्द : हा ठराव स्थगीत ठेवण्यात यावा.

(यावेळी सभागृहात स.सदस्य एकत्रित बोलतात)

मा.सभापती :हा ठराव मंजूर करण्यात येत आहे. आता राष्ट्रगिताने सभा संपेल.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक 1/7/2010 ते 30/6/2011 या कालावधीसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्यीत आयात होणाऱ्या मालावरील जकात कर व रहदारी फी वसुलीकरिता खाजगी अभिकर्ता नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी जास्त देकार रक्कम असलेले निविदाधारक मे. सहकार ग्लोबल प्रा. लि., मालाड (प), मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रक्कम रूपये 138,00,60,000/- (रूपये एकशे अडोतीस कोटी साठ हजार फक्त) चा सर्वाधिक (Highest Bid) देकार रक्कम असलेले निविदाधारक मे. सहकार ग्लोबल प्रा. लि., मालाड (प), मुंबई यांची दिनांक 1/7/2010 ते 30/6/2011 या कालावधीसाठी जकात वसुली करण्यासाठी "जकात संकलन अभिकर्ता" म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीनंतर सभा संपल्याचे मा.सभापती, स्थायी समिती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद